# पानिपतचा शेवटचा संग्राम


लेखक

**भारताचार्य – चिं.वि.वैद्य**



**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**पानिपतचा शेवटचा संग्राम : भारताचार्य – चिं. वि. वैद्य**

**© सुरक्षित**

**प्रकाशक**

समन्वय प्रकाशन

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**

अजब डिस्ट्रिब्युटर्स

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**

अरुणा चव्हाण

**मुखपृष्ठ**

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**

ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**

सप्टेंबर, २०१३

**किंमत**

₹ ३४०/-

## * प्रस्तावना

रा. रा. नागेशराव बापट यांनी लिहिलेली 'पानिपतची मोहीम' ही कादंबरी सुमारे वीस-बावीस वर्षांपूर्वी प्रथम प्रसिद्ध झाली, त्यावेळी ती कादंबरी वाचून मला ही कादंबरी लिहिण्याची कल्पना सुचली. त्याप्रमाणे तिचा अर्धा भाग त्याचवेळी म्हणजे २०-२२ वर्षांपूर्वी मी लिहिला. त्यानंतर अनेक कारणांनी ती संपूर्ण करण्यास मला वेळ मिळाला नाही. पण लिहिलेली कादंबरी बरी आहे, ती संपूर्ण करून लोकांसमोर ठेवल्यास लोकांना पसंत पडेल, असे मला व माझ्या कित्येक मित्रांस वाटल्यावरून मी ही कादंबरी हल्ली फुरसत मिळाल्याने संपूर्ण केली आहे व ती वाचकांपुढे ठेवीत आहे. ती कितपण चांगली आहे, याचा निर्णय करणे अर्थातच वाचकांकडे आहे.

रा. रा. बापट यांची याच संग्रामावरील कादंबरी उत्कृष्ट असून, ती नामदार जस्टिस रानडे यांनीही आपल्या मराठी वाङ्मयावरील निबंधात चांगल्या ग्रंथांत निवडली आहे. हा निर्णय सर्वांस व मलाही मान्य आहे. पण या कादंबरीत ऐतिहासिक कादंबरी या दृष्टीने जो एक दोष मला वाटला व ज्यामुळेच मला आपली कादंबरी लिहिण्याची स्फूर्ती झाली, तो येथे सांगितला पाहिजे. माझ्या मते ऐतिहासिक कादंबरीत किंवा नाटकांत ऐतिहासिक ठळक ठळक गोष्टींचा विपर्यास केलेला नसावा. असा विपर्यास केला असेल तर रसभंग होतो. अतिशयोक्तीचे उदाहरण घेणे तर भीमाला अशक्त बनविणारे किंवा कर्णास स्वामिद्रोही दाखविणारे संविधानक असल्यास रसभंग होईल, हे उघड आहे. अशा प्रकारचा दोष या कादंबरीत आहे. पानपतच्या संग्रामाच्या वेळी महादजी शिंद्यांस महत्त्व नव्हते; शिंद्यांचे पुढारी त्यावेळेस जनकोजी शिंदे होते, त्यांनी या लढाईत अद्वितीय पराक्रम केला, ही गोष्ट मशहूर आहे. जनकोजीस मागे टाकून या कादंबरीत महादजीस पुढे केला आहे, हे यात मोठेच व्यंग मला वाटले. याशिवाय आणखीही ऐतिहासिक गोष्टींचा विपर्यास झालेला मला दिसला. ऐतिहासिक कथानक जसेच्या तसे ठेवून व त्याला कल्पित गोष्टींची पुस्ती देऊन पानपतच्या लढाईची हकिकत अधिक सुसंबद्ध व रमणीय करता येईल की नाही, हे प्रत्यक्ष कादंबरी लिहून पाहावे असे मनात येऊन, मी या कादंबरीतील संविधानक बसविले आहे. या संविधानकाने ऐतिहासिक हकिकतीस सुसंगतीही आली आहे, हे

वाचकांस दिसून येईल. भाऊसाहेब पानपतावर दोन महिने का पडून राहिले, आदले रात्री ठरल्याप्रमाणे गोल न बांधता भाऊसाहेबांनी लढाई का दिली, पार्वतीबाईंचा; 'शेवटपर्यंत भाऊसाहेब रणात मेले नाहीत' असा समज का राहिला, नानासाहेब पेशव्यांनी दुसरे लग्न कसे केले, सुजाउद्दौल्याला भाऊसाहेबांनी शेवटची चिठ्ठी कशी लिहिली, अबदालीस गैरसावधपणात मारण्याचा भाऊसाहेबांचा बेत कसा फसला, इत्यादी मूळ हकिकतीतील मोकळ्या जागा, म्हणजे न सुटलेले मुद्दे, कल्पित कथानकाच्या जोडीने या कादंबरीत कसे भरून आले आहेत हे वाचकांनी लक्ष देऊन पाहावे; अशी माझी शिफारस आहे. याशिवाय रा. बापट यांच्या कादंबरीत भाऊसाहेब व त्यांची पत्नी व विश्वासराव व त्यांची पत्नी यांचा लढाईच्या पूर्वीच्या रात्री झालेला एकांतातील संवाद एकाच स्वरूपाचा व अप्रासंगिक आहे, असे माझे मत आहे. तो प्रसंग या कादंबरीत निराळ्या तऱ्हेने दाखविला आहे.

असो; या कादंबरीस मूळ आधार 'भाऊसाहेबांची बखर' हा उत्कृष्ट जुना ग्रंथ घेतला आहे. त्यातील हकिकतीस Ellit's-Historians of India यातील मुसलमानी इतिहासकारांनी दिलेल्या हकिकतीची भर घातली आहे. शिवाय, राजवाडे यांनी मिळविलेल्या अमोल पत्रव्यवहाराचीही मदत घेतली आहे. सारांश, यातील ऐतिहासिक भाग बहुतेक संपूर्ण असून, सर्वांशी जशाच्या तसा (एक लहानसा मुद्दा खेरीजकरून) यात दिलेला आहे. पानपताच्या लढाईचा नकाशाही यांत दिलेला आहे. त्याजवरून पानपतच्या युद्धाची समजूत चांगली पटेल, असे मला वाटते. एकंदरीत निरनिराळ्या आधारांवरून पानपताची हकिकत यात एके ठिकाणी केलेली असून ती मनोरंजक व ऐतिहासिक दर्जाची आहे, असे म्हणण्यास मला हरकत वाटत नाही.

या पुस्तकाचे हस्तलिखित रा. ब. काशिनाथ नारायण साने यांनी वाचून ठिकठिकाणी मला योग्य सूचना केल्या, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. किंबहुना त्यांनी ही कादंबरी लोकांसमोर ठेवण्यास हरकत नाही, असे प्रोत्साहन दिल्यावरूनच, मी ती लोकांसमोर ठेवण्याचे धाडस करीत आहे. तरी ती लोकांस पसंत पडेल, अशी मी आशा करतो.

**चिंतामण विनायक वैद्य**

***

भाग १

## प्रकरण पहिले

### १

दोन प्रहरांनंतर तीन वाजण्याचा सुमार झाला होता. माहुलीच्या किल्ल्यावर वैशाख महिन्याच्या तीव्र उन्हामुळे जरी विशेष संताप होत नव्हता, तथापि, रघुनाथराव वाड्यातील दिवाणखान्यात एक अंगवस्त्र अंगावर घेऊन झोप काढीत होते. माजघरात सीताबाई पाटावर काहीसे घेऊन निवडत बसल्या होत्या. इतक्यात त्यांच्या मनात काही विचार येऊन त्यांनी आपल्या लाडक्या मुलीस हाक मारली. ''रंगू, अगं रंगू.'' हाक ऐकल्याबरोबर आपली चरित्रनायिका माजघरात आली. अहाहा! परमेश्वराने आपले सर्व सौंदर्यनिर्माण-चातुर्य त्या स्त्री रत्नातच ओतले होते काय? तिची ती उंच तेजस्वी मूर्ती, तिचा तो गोरोचनापरीस गौरवर्ण, मोदकासारखा वर्तुळ लांबट चेहरा, हरिणासारखे काळेभोर व विशाल डोळे, चाफेकळीसारखे सरळ नाक, इत्यादी गोष्टींचे वर्णन करण्यास कवीजवळ शब्दापलीकडे दुसरे काहीच साधन नाही, व तेही शब्द पूर्व कवींनी योजून टाकिले आहेत. चिताऱ्यास चित्र काढून एखाद्या सुंदर वस्तूचे किंचिदंशाने तरी दाखविता येईल; पण आपल्या चरित्रनायिकेच्या रूपाची कल्पना देण्यास सरस्वतीदेवीसुद्धा असमर्थ आहे असे वाटते. असो. या वेळेस तर रंगूबाईच्या सौंदर्यास यौवनाने असे काही विलक्षण मोहकत्व आणिले होते की, जो तो तिच्याकडे पाही त्याच्यावर त्या मोहकत्वाचा तात्काळ परिणाम झाल्यावाचून राहत नसे. तिच्या विशाल नेत्रांत असे काही तेज चमकत होते की, ज्या ज्याकडे ती आपली डोळे फिरवून पूर्ण दृष्टीने पाही, तो तो ठिकाणच्या ठिकाणी दिपून जाऊन त्याची दृष्टी गपकर

जमिनीकडे लागे व त्याच्या चित्तवृत्तीचा गोंधळ झाल्यावाचून राहत नसे. रंगूबाईच्या नेत्रांत जसे विलक्षण तेज होते, त्याप्रमाणेच तिच्या शरीराचा बांधाही विलक्षण मोहक होता व यौवनभराने तिच्या अंगयष्टीस अतिशयच शोभा आणिली होती. पायापासून कमरेपर्यंत शरीराचा भाग कालिदासोक्तीप्रमाणे ऋज्वायत म्हणजे सरळ दीर्घ अन् इतका शोभायमान दिसे की, जणू काय कामदेव तिच्या पायदळी लोटांगण घालीत आहे असा भास होई. त्रिवली, कृशोदर व विस्तीर्ण श्रोणी या तिहींचा समवाय केवळ कविकल्पनेतच आहे असे कित्येकांस वाटते. परंतु सुखात वाढलेल्या एखाद्या सशक्त व गोंडस बांध्याच्या युवतीच्या सडपातळ शरीरात तीनही गोष्टी एके ठिकाणी कशा सापडतात याची सत्यता रंगूबाईच्या सुंदर शरीराकडे पाहिले म्हणजे दिसून येई. तिच्या कमरेकडे लुगड्याचा रेशमी काठ असा काही आत घुसलेला दिसे की, जणू काय त्या काठास तिच्या कृश कटीचा अद्याप शोध लागला नाही असे वाटे. सारांश एका संस्कृत कवीने ''वापी कापि स्फुरति गमने'' इत्यादी श्लोकात अतिशयोक्तीचे केलेले वर्णन आमच्या चरित्रनायिकेस उत्तर रीतीने लागू होत होते, असे म्हणण्यास हरकत नाही.

आनंदाच्या लहरीत जलदी जलदी चालत ती सुंदरी मध्यघरात येऊन प्रेमळ व सुस्वर शब्दाने ''काय गं आई?'' म्हणून प्रश्न करीत असता सीताबाईने आपल्या लाडक्या मुलीच्या मुखाकडे पाहिले तेव्हा तिला एकदम दुःखाद्वेगाचा झटका येऊन तिच्या चेहऱ्यावर एकदा विवर्णाची लहरी येऊन गेली. काय करील बिचारी! निष्कलंक चंद्र आकाशात पाहून कदाचित अधिक आनंद होईल. पण निष्कलंक असा स्त्रीमुखचंद्र पाहून कोणाच्या पोटात दुःखाचा उमाळा येणार नाही? रंगूबाईच्या लोकोत्तर सौंदर्याची विटंबना करण्याकरिताच की काय, दुष्ट यमाने तिच्या कपाळावरील तिलक पुसून टाकिला होता. आणि खरेच अशा अनुपम स्त्रीरत्नाचा उपभोग घेण्यास केवढी तरी तपश्चर्या नवऱ्याच्या पदरी पाहिजे होती. तिचा हतभागी पती जरी एका श्रीमंत जहागिरदाराचा एकुलता एक मुलगा होता तरी त्या बिचाऱ्याच्या पदरी सुकृत कमी होते व त्याच्या शोचनीय मृत्यूमुळे रंगूबाईस सातव्या वर्षीच वैधव्य प्राप्त होऊन आपल्या पित्याच्या घरी परत यावे लागले होते. तेव्हापासून या भूलोकीच्या अप्सरेचे पालनपोषण तिच्या शांत व प्रेमळ बापाने केले व तिचे लाड त्याने इतके पुरविले की, तिला आपल्या दुर्दैवी

स्थितीची आठवण होऊ दिली नाही. पण जसजशी रंगूभाई यौवनभरात येऊ लागली तसतशी त्या मातापित्यांची चित्तवृत्ती दु:खाने उचंबळू लागून त्यांचे धैर्य आणि शक्ती ओहोटत चालल्या. जसजशी यौवनाची प्रभा तिच्या मुखावर पसरून तिचा मुखचंद्र तेजस्वी दिसू लागला तसतसे तिच्या मातापितरांचे मुख निस्तेज पडत चालले. जसजसे तिचे नेत्र-कमल पाण्याने चमकू लागले तसतसे त्यांचे डोळे अश्रुरहित होऊन शुष्क पडू लागले. तिचा उरोभाग जसजसा उन्नत होऊ लागला तसतशी त्यांची छाती खचत चालली. फार काय वर्णन करावे? रंगूबाईच्या अनुपम सौंदर्याचा यौवनाने केलेला विकास पाहून त्या मातापितरांचा आनंद मिटत चालला व तिचे दुर्दैव व तिची भावी स्थिती याविषयीच्या भयंकर कल्पना मनात आल्या म्हणजे तिच्या आईच्या तर पोटात धस्स होऊ लागले.

आपल्या आनंदित व अल्लड वर्तनाकडे पाहून आईच्या पोटात दु:खोद्वेग आला व तिचा चेहरा विवर्ण झाला हे रंगूबाईच्या लक्षात आले नाही. आईबापाच्या विशेषत: बापाच्या लाडामुळे रंगूबाईचा स्वभाव किंचित उच्छृंखल, हट्टी व उनाड असा झाला होता. तिला जरी नुकतेच नहाण आले होते, तरी तिला अजून पुष्कळ गोष्टी समजत नव्हत्या. रघुनाथरावाने बाहेर जाणे बहुतेक सोडून दिले होते व घरात आईशिवाय व बाहेर रघुनाथरावांशिवाय रंगूस दुसऱ्या कोणाचाच सहवास नसे. यामुळे जगाचे अनुभविक ज्ञान रंगूबाईस मुळीच मिळत नव्हते. पण तिची बुद्धी अत्यंत तीव्र होती व तिला बापाने लिहावयास व वाचावयास शिकविले होते, यामुळे व तिच्या अत्युत्कृष्ट कल्पनाशक्तीमुळे मात्र तिला काही काही गोष्टी समजू लागल्या होत्या.

सीताबाईने आपला दु:खोद्वेग आवरून मोठ्या ममतेने म्हटले, ''रंगू, कालच्या पुढचा रामायणाचा अध्याय वाच बरे. माझ्याने बाई आतासे किल्ल्याखाली पुराणाला जाववत नाही. म्हटलं होतं की, एकदा पुरं रामायण गोविंदशास्त्र्यांच्या तोंडचे ऐकेन. पण काय झाले आहे कोण जाणे, माझी शक्ती कशी बाई खचतच चालली आहे.'' रंगू म्हणाली, ''कशाला जातेस उन्हाची? आणि मग मला एकटीलाच घरात राहावे लागते.'' असे म्हणून तिने पोथी खाली काढली व अध्याय काढून वाचण्यास प्रारंभ केला. होणारी गोष्ट चुकत नाही. सीतेने आपल्यास पृथ्वीच्या पोटात घालून प्राण दिला ही अत्यंत हृदयद्रावक कथा त्या अध्यायात होती. ती वाचताना व ऐकताना रंगूबाईच्या व सीताबाईच्या अंत:करणात नानाप्रकारचे

विचार येत होते व दोघींचीही चित्तवृत्ती दु:खाने गडबडून गेली होती. इतक्यात रंगूबाईने पोथीचे पान खाली ठेवून म्हटले, ''आई, सीतेचे रामावर इतके प्रेम होते, मग रामास दु:खात टाकून ती पृथ्वीच्या पोटात कशी गं नाहीशी झाली?'' हा प्रश्न ऐकताच सीताबाईंच्या मनात निरनिराळ्या चमत्कारिक कल्पना आल्या व किंचित् रागाने त्या म्हणाल्या, ''रंगू, तू बाई प्रश्नबिश्न नको विचारू. तू आपली मुकाट्यानेच अध्याय वाच वाचीत असलीस तर.''

रंगूबाईस बहुतेककरून कोणी कधीही रागे भरत नसे, यामुळे तिच्या कोमल अंत:करणास आईचे ते तितकेच रागाचे शब्द लागले. तिने आपले साश्रू सतेज विशाल नेत्र आईकडे करून किंचित सद्गदित शब्दाने म्हटले, ''आई, मी आता पुन्हा नाही विचारणार.'' पण तिच्याने अध्याय पुढे वाचवेना व तिला रडण्याचा बारीक बारीक हुंदका येऊ लागला. सीताबाई म्हणाल्या, ''रंगे, तुला मी काही वावगे बोलले तरी काय, ती तू रडायला लागलीस? फारच बाई लाडकी करून ठेवली आहे आणि आता सासरी जावे लागेल नि तिथे सासू आहे ना? अशी अक्षयी रडायला लागलीस तर कसे होईल?''

रंगूच्या मनात अलीकडे सासरच्या संबंधाचे थोडे थोडे विचार येऊ लागले होते व तिने हेही ऐकले होते की, आपली सासू फारच खाष्ट आहे. सासरी आपले फारच हाल होतील, आपल्यास त्रिभुवनात कोणीही वाली राहणार नाही, इत्यादी कल्पना तिच्या मनात येऊ लागल्या होत्या. पण तिने कंठाबाहेर आजपावेतो एक शब्दही काढला नव्हता. आईचे वरील शब्द ऐकताच तिच्या कल्पनेसमोर आपल्या भावी दु:स्थितीचे चित्र उभे राहिले. तिचा स्वभाव तापट व सरळ असल्यामुळे व बापाच्या अत्यंत लाडामुळे तिला मनोवृत्तीवर दाब ठेवण्याची मुळीच सवय नव्हती. तिला एकदम मोठा हुंदका आला. तिने उठून आईच्या गळ्यास मिठी मारिली आणि केवील स्वराने म्हटले, ''आई, मला सासरी पाठवू नको.'' सीताबाईचे हृदय अगोदरच कोमल, त्यांत आपल्या एकुलत्या एक बालविधवा कन्येचे हे केविलवाणे शब्द ऐकून ती वत्सला गहिवरली. काय आताच माझ्या पोरीचा व माझा वियोग होतो व तिला आताच दु:ख समुद्रात कोणी ढकलीत आहे असे तिला वाटू लागले. ''माझी बाळ ती,'' असे म्हणून सीताबाईने मुलीस पोटाशी धरले, तिला पाठीवरून कुरवाळले व तिनेही स्फुंदून रडण्यास प्रारंभ केला.

रडण्याचा स्वर आजपर्यंत रघुनाथरावांनी आपल्या घरात ऐकला नव्हता. त्या मायलेकींच्या रडण्याने रघुनाथराव जागे झाले व काय झाले आहे याची चौकशी करण्याकरिता झट्दिशी उठून घरात आले. त्यांस पाहून सीताबाई व रंगूबाई उठून उभ्या राहिल्या. ''रंगे, का गं रडतेस?'' म्हणून बापाने विचारले. पण कोणीही उत्तर देईना. रघुनाथरावांनी मुद्दाम विषय बदलण्याकरिता तिला चूळ भरण्यासाठी पेलाभर पाणी आणावयास सांगितले, ते तिने ताबडतोब आणले व बापाच्या हातात पेला दिला. तिच्या डोळ्यांतून अश्रूधारा चालल्याच होत्या. रघुनाथरावांनी दुसऱ्या हाताने तिचा हात धरून तिला पोटाशी धरले व म्हटले, ''रंगे, रडू नको, काय झाले ते मला सांग पाहू!'' रंगूबाई बापाची अत्यंत लाडकी असल्यामुळे किंचित शांत होऊन म्हणाली, ''काही नाही दादा, मी पोथी वाचीत होते तेव्हा मी आईला विचारले की रामावर सीतेचे इतके प्रेम होते तर तिने त्याला दु:खात टाकून प्राण का दिला? तेव्हा आई मजवर रागावली नि म्हणाली की, तू प्रश्नबिश्न नको विचारीत जाऊ.'' हे ऐकून रघुनाथराव म्हणाले, ''हत्तेच्या, तुझी आई वेडी आहे. तिला उत्तर देता आले नाही, म्हणून तिने 'शेषं कोपेन पूरयेत्' असे केले. हे पहा स्त्रियांना पातिव्रत्य फार प्रिय असते व तेच त्यांचे भूषण आहे. जेव्हा रामचंद्राने सुद्धा आपल्या पातिव्रत्याविषयी शंका घेतली तेव्हा आपण जगून तरी पतीस काय सुख होणार आहे असे वाटून तिने आपला प्राण दिला. इतक्यात सीताबाई किंचित् आवेशाने म्हणाल्या ''माझे वेडीचे थोडेसे म्हणणे ऐकायचे होते. आता रंगी काही लहान नाही. तिला लिहावयास शिकवू नये म्हणून म्हटले होते पण ते ऐकायचे झाले नाही. आता तरी तिच्याशी असली भाषणे करू नयेत. मी परवा गावात ऐकले, कोणतीशी बाई पुण्याहून आली होती. ती म्हणत होती की, रंगीला सासरचे बोलावणे येणार आहे. तिथे गेल्यावर नानाप्रकारची बोलणी ही बोलेल. मग इकडे कोणी बोल ठेवणार नाही; मला मात्र नांवे ठेवतील की सटवीने पोरीला काय भाट करून सोडले आहे. गोखल्यांच्या घरात काही वळणच नाही.'' रंगूबाईच्या मनात सासरचा भयंकर देखावा घोळतच होता तो प्रसंग या बोलण्यावरून खराच लवकर ओढवतो , असे तिला वाटू लागले व तिने मध्येच, ''पण दादा, मला नाही पाठवले तर नाही का चालणार?'' असे म्हणून केविलवाणे तोंड केले व अश्रुधारांचा वर्षाव करणाऱ्या आपल्या नेत्रांनी आपल्या बापास जणू काय स्नानच घातले. रंगूबाईच्या सासरी जाण्यासंबंधाने

रघुनाथरावांच्या मनात आजपर्यंत इतक्या स्पष्ट रीतीने कधीच विचार आला नव्हता. पण मुलीस बोलावणे आल्यावर सासरी पाठवू नये अशा कल्पनेकडे त्यांच्या विचाराचा कल कधीच झाला नव्हता. जुन्या चालीच्या संभावित घराण्यांत हा विचार कधीच उपस्थित होत नाही. परंतु त्या गाईकडे पाहून त्यांच्याने या वेळेस स्पष्ट जबाब देववेना. सरतेशेवटी ते म्हणाले, ''काय वेडी आहे ही? गावातली कुणकुण ती काय आणि एवढ्यांतच हे भांडण व ही रडारड कशास पाहिजे? पण रंगे, तू पुणे नाही ना पाहिलेस? वा: काय पुणे शहर आहे? तुला आपले बाळाजीपंत आठवतात काय गं?''

आजपर्यंत रंगूने काही म्हटले व ते बापाने नाकबूल केले असे कधीच झाले नव्हते. पण या वेळच्या भाषणाचा रोख काही निराळा आहे, असे तिच्या लक्षात तात्काळ येऊन गेले. रंगू जरी लाडकी होती तरी फार समजूतदार व हुशार होती. तिने बापाने ठेवलेले भांडे चटकन् उचलले व ते ठेवण्याच्या मिषाने ती स्वयंपाकघरात निघून गेली. जातेवेळच्या तिच्या त्या निराश वृत्तीची दया रघुनाथरावास आल्यावाचून राहिली नाही. त्यांचे अंत:करण सद्‌गदित झाले व ते म्हणाले, ''तू हा नसता घोळ उत्पन्न केला आहेस. यावाचून काही अडले होते? उगीच आता पोरीच्या जिवाला टोचणी लागली आहे.'' असे म्हणत असताना त्यांच्या डोळ्यांत पाणी आले. रंगूला बराच वेळ घरात गेलेली पाहून तिला ते हाक मारणार होते. पण इतक्यात किल्ल्याच्या दरवाजावरून शिंगाचा आवाज ऐकू आला; त्यामुळे ते गडबडीने बाहेर गेले.

*

## २

पाच-सहा स्वार व माणसे वरती किल्ल्याकडें येत आहेत, असे पाहून, दरवाज्यावरील पहारेवाल्याने शिंग फुंकले होते. हां हां म्हणता स्वार दरवाज्यापाशी दाखल झाले . ते कोण खासगी कामासंबंधाने आले आहेत असे पहारेवाल्याने ताडून त्यांस आत जाऊ दिले. वाड्याशी येताच एक स्वार घोड्यावरून उतरून पुढे झाला. रघुनाथराव वाड्याच्या दरवाज्यापाशी आलेच होते, त्यांस त्याने लवून नमस्कार केला व म्हटले, ''मी नारायणराव, नमस्कार करतो. पुण्याहून आले आहे.'' ते शब्द ऐकताच आपल्या रंगूस नेण्याकरिता सासरकडून मनुष्ये आली